**नियमित फौजदारी खटला क्र.२२४/२०१५**
**शासन वि. अफरोज पठाण**
**नि.क्र.६५**

**सरकारतर्फे साक्षीदार क्र.५**

**नाव – भगवान दत्तात्रय कापकर**

**वय – ६२ वर्षे**

**व्यवसाय – निवृत्त ठाणेदार**

**पत्ता – नांदेड**

**साक्षीदार यांचा शपथेवर सरतपास सरकारतर्फे अधिवक्ता श्री.ए.एस.कदम यांच्याद्वारे सुरुः–**

दि.०९/०२/२०१५ ला मी ग्रामीण पोलिस स्टेशन, उदगीर येथे ए.पी.आय. या पदावर नियुक्त होतो. अपराध क्र.१५/२०१५ चा तपास माझ्याकडे आलेला होता. सकाळी ०५.५५ ला दवाखान्यात जाऊन आम्ही पुढे फिर्यादीचा जबाब नोंदवला. डॉक्टरने जबाब घेतल्याबाबत त्यावर पोहच दिली. मला नि.क्र.३६ वरील फिर्याद दाखवली, ती तीच आहे. त्यावर फिर्यादी व माझी सही आहे. त्यानंतर ठाणे अंमलदार श्री.जगताप यांनी गुन्हा नोंदवला. त्यांनी मग तपास माझ्याकडे सुपुर्द केला.

मी तपासकामी उदगीर ग्रामीण रुग्णालय येथे दोन पंचांसमक्ष फिर्यादीचे कपडे जप्त केले. मला आता जप्तीनामा दाखवला, दि.०९/०२/२०१५ रोजीचा जप्तीनामा मलाा दाखवला, तो तोच आहे, त्याला **नि.क्र.६६**. फिर्यादीच्या अंगावरील कपडे त्यावर रक्ताचे डाग होते, ते जप्त केले. लाईनींगची पॅन्ट मला दाखवली, फिकट आकाशी रंगाचा शर्ट मला दशखवला, तो तोच आहे, त्या दोन्हीला लेबल असून त्यावर पंचांच्या व माझ्या सह्या आहेत. त्यांना **आर्टीकल 'अ' व 'ब'** देण्यात आले.

त्यानंतर मी घटनास्थळी जाऊन दोन पंचांसमक्ष घटनास्थळ पंचनामा केला. ०८.५५ ते ०९.५५ च्या दरम्यान जो पंचनामा केला तो तोच आहे, त्यावर माझी व पंचांच्या सह्या आहेत, त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्याला **नि.क्र.६७**. मी नंतर पाच साक्षीदारांचे जाब जबाब नोंदवले. मी मग गुन्ह्यातील आरोपीला अटक केली.

मी आरोपीला दि.०९/०२/२०१५ ला अटक केली. त्याबाबत मी दोन पंचांसमक्ष पंचनामा केला. मला अटक पंचनामा दाखवला, तो तोच आहे, त्यावर माझी व पंचाची सही आहे, त्याला **नि.क्र.६८**. गुन्ह्याच्या कामी आरोपीचा शर्ट आम्ही जप्त केला. मला आता जप्तीनामा दाखवला, तो तोच आहे, त्यावर माझी, दोन पंचांच्या व आरोपीची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्याला **नि.क्र.६९**. मला आता मुद्देमालातील फिकट हिरवा व पांढरा चौखड्याचा शर्ट दाखवला, तो तोच आहे, त्याला आर्टीकल **'क'**. साक्षीदार पुन्हा सांगतो की, आर्टीकल 'क' वरील शर्ट हा फिर्यादीचा असून आर्टीकल 'ब' म्हणून जप्त असणारा शर्ट हा आरोपीचा आहे.

दुसऱ्या दिसशी आरोपींना गुन्ह्यात वापरण्यात आलेला चाकु काढून देतो असे निवेदन केले. मी दोन पंचांसमक्ष त्याचे निवेदन नोंदवून घेतले. मला आरोपीचे निवेदन दाखवले, ते तेच आहे, त्यावर पंचाची व माझी सही आहे, तसेच आरोपीची पण सही आहे, त्याला **नि.क्र.७०**. आरोपीने पिंजारी याच्या बांधकामाच्या वाळूखाली ठेवलेले गुन्ह्यात वापरलेला चाकु काढून दिला. तो एक लाकडी व पितळी मुठ असलेला खटक्याचा चाकू ज्याला साडे चार इंच लांब पाते होते असा काढून दिला. त्याचा पंचनामा केला, पंचनामा झाल्यावर दोन पंचांच्या, आरोपीची व माझी सही केली, त्याला

**नि.क्र.७१**. आरोपीकडून जप्त केलेला चाकू मला दाखवला तर तो मी ओळखू शकतो. मला आता जी.एम.आर.क्र.२५/२०२६ मधील खटक्याचा चाकू दाखवला, तो तोच आहे, त्यावर पंचांच्या सह्याचा लेबल आहे. त्यावर पंचाच्या सह्या दिसत नाहीत. त्यावर माझी असणारी सही दिसते. **(सरकारी वकील यांनी मुद्देमालावर असणारी सोलोटेपचे कव्हर फाडून काढले, उघडलेले लेबल पाहून साक्षीदार पुढील साक्ष देतो.)** नंबर एक पंच अजीम दुसरा मुकदूम यांच्या सह्या दिसतात. त्याला **आर्टीकल 'ड'**.

मी मुद्देमाल पोलिस स्टेशनला दाखल केला, त्याची पावती तयार करण्यात आली, मला मुद्देमाल पावती दाखवली, ती तीच आहे, त्यावर मुद्देमाल कारकून व माझी सही आहे, त्याला **नि.क्र.७२**. त्यानंतर पुढील तपास पी.एस.आय. जाधव यांनी केला.

<u>साक्षीदाराचा शपथेवर उलटतपास आरोपीतर्फे श्री.एन.एन.पटेल यांनी अर्ज दिल्यामुळे उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात येतो.</u>

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

Digitally signed by VIJAY RAMCHANDRA GHARAL
Date: 2026.07.24 16:56:37 +0530

**ठिकाणःउदगीर** **न्यायदंडाधिकारी प्र.व.**
**दिनांकः२४/०७/२०२६** **(न्यायालय क्रं. १), उदगीर.**